एक निर्भिड गर्जना समाजातील प्रत्येकाची....
प्रत्येकातील माणसाची.....

# वारणेचा वाघ

Kodoli (Kolhapur) • वर्ष १९ • अंक १२ • २५ फेब्रुवारी २०२० ते ०२ मार्च २०२० (साप्ताहिक)• किंमत रु. २/-
पृष्ठ संख्या ४ • पान १ • RNI NO. MAHMAR/2003/9554 • Posting Reg.No.KLR-66/2020-2022 • WPP license No. GR/KLP/108/2020-22

## वारणेचा वाघ फाउंडेशनचे अध्यक्ष प्रविण पाटील यांचा वाढदिवस उत्साहात



**कोडोली (प्रतिनिधी) येथील वारणेच्या फाउंडेशनचे अध्यक्ष प्रविण पाटील यांचा वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला. सकाळी घरी औक्षण झाल्यानंतर त्यांनी शुभेच्छा स्वीकारल्या याप्रसंगी वारणेचा वाघ कार्यालयात मराठी वृत्तपत्रसृष्टीचे जनक दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती साजरी करण्यात आली.** असोसिएशन ऑफ स्मॉल अँड मिडीयम न्यूजपेपर्स ऑफ इंडियाचे प्रदेशाध्यक्ष आप्पासाहेब पाटील यांच्या हस्ते बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले यावेळी वारणा कारखान्याचे संचालक विलास पाटील, वारणेचा वाघ चे संस्थापक पी.डी. पाटील सूर्यकांत पाटील (पलूस) संदीप पोतदार, प्रथमेश पाटील उपस्थित होते.

वाढदिवसानिमित्त प्रविण पाटील यांना पुणे जिल्ह्यातील भोरचे काँग्रेस आमदार संग्रामसिंह थोपटे ,मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे उमेदवार धनंजय वाडकर, जिल्हा परिषदेचे माजी शिक्षण सभापती अमरसिंह पाटील, नवीन पाटील, यशवंतराव चव्हाण पतसंस्थेचे संचालक गणपती शेडगे, कोडोली को ऑप. हौसिंग सोसायटीचे संचालक नरेंद्र पाटील, रोटरी ग्रामसेवा वारणा परिसर परिसराचे सर्व सदस्य, कैलास मोटर्सचे सुरेश काळगे, विश्वास जाधव, समाधान पाटील, राजकुमार जाधव यांनी प्रत्यक्ष भेटून शुभेच्छा दिल्या.

# पंचायत समित्यांनाही जादा अधिकार देण्याचा मानस - ग्रामविकासमंत्री हसन मुश्रीफ

**कोल्हापूर (प्रतिनिधी) राज्यातील पंचायत समित्या अधिक सक्षम करण्यासाठी यापुढे पंचायत समित्यांनाही जादा अधिकार देण्याचा म ानस ग्रामविकासमंत्री हसन मुश्रीफ यांनी येथे बोलताना व्यक्त केला.**

जिल्हा परिषद अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या क्रीडा स्पर्धेचे उदघाटन ग्रामविकासमंत्री हसन मुश्रीफ यांच्या हस्ते आणि पालकमंत्री सतेज ऊर्फ बंटी पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पोलीस परेड झाले, त्यावेळी ते बोलत होते. समारंभास खासदास धैर्यशिल माने, जिल्हा परिषद अध्यक्ष बजरंग पाटील, आमदार ऋतुराज पाटील, जिल्हाधिकारी दौलत



देसाई, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अमन मि त्तल, उपाध्यक्ष सतीश पाटील आदीजण उपस्थित होते.

पंचायत राज व्यवस्था अधिक मजबूत आणि सक्षम करण्याच्या दृष्टीने ग्राम विकास विभागाचे काम सुरु असल्याचे सांगून ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ म्हणाले, पंचायत राज व्यवस्थेने जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्राम पंचायत स्तरावर अधिकाराचे विकेंद्रीकरण झाले असून या व्यवस्थेमुळे ग्रामीण भागाचा कायापालट करण्याची संधी गाव पातळीपर्यंत मिळाली आहे. १५ व्या वित्त आयोगात पंचायत समित्यांनाही अधिकचा निधी देवून त्यांना काही अधिकार देण्याचा शासनाचा मानस असल्याचेही ते म्हणाले.

कोल्हापूर जिल्हा परिषद राज्यातील एक आदर्श व अग्रेसर जिल्हा परिषद बनविण्याचा आपला मानस असल्याचे सांगून ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ म्हणाले, जिल्हा परिषदेच्या माध्यम ातून गावा गावात विकास कामे करुन गावे विकासाद्वारे अधिक समृध्द आणि स्वयंपूर्ण करण्याचा प्रयत्न आहे. यासाठी जिल्हा परिषदेच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांचेही योगदान गरजेचे आहे. अधिकारी, कर्मचाऱ्यांनी आपण जनतेचे सेवक आहोत ही भुमिका जोपासून जिल्हा

**पान ४ वर**


## काळ आला होता, मात्र वेळ येऊ दिली नाही
## मगरीचा हल्ला परतवत बैलाने वाचविले मालकाचे प्राण



**कोडोली (प्रतिनिधी) सातवे ता .पन्हाळा येथे वारणा नदीत बैलांना पाणी पाजण्यासाठी गेलेल्या तरुण शेतकऱ्यावर मगरीने प्राणघातक हल्ला केला. म ात्र बैलाचा कासरा हाताला गुंडाळला असल्यामुळे आणि बैलाच्या चतुरपणामुळे शेतकरी मगरीच्या हल्लयातून बचावला. महेश काटे (वय २८ वर्षे )या तरुण शेतकऱ्याचे नाव आहे. मगरीच्या हल्लयात त्याच्या डाव्या पायाच्या नसा तुटल्याने तो गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.**

याबाबत अधिक माहिती अशी सातवे येथील वारणा नदी काठावर असलेल्या वाण्याची मळी परिसरात महेश काटे बैलांच्या साह्याने मशागत करण्यासाठी गेला होता. दुपारी विश्रांती पूर्वी बैलांना पाणी पाजण्यासाठी नदीवर घेऊन गेला होता पाणी पीत असलेल्या बैलाला धुण्यासाठी तो नदीच्या पात्रात उतरला यावेळी अचानक मगरीने त्याच्या पायावर हल्ला करून त्याला पाण्यात ओढून नेण्याचा प्रयत्न केला. मगरीच्या तावडीतून सुटण्याचा त्याने प्रयत्न केला पण त्याची ताकद अपुरी पडत होती मगरीच्या हल्लयाने बैलही बिथरला होता. बैलाचा कासरा महेश काटे यांनी हाताला गुंडाळला होता बिथरलेल्या बैलाने आपल्या मालकावर आलेले संकट ओळखून कासरा धरलेल्या आपल्या मालकाला नदीच्या पाण्यातून बाहेर काठावर आणले. बैलाचा कासरा घट्ट धरल्याने आणि बैलाने दाखविलेल्या चतुरपणाम ुळे त्याचा जीव वाचला. बैलाने पाण्याबाहेर काढल्यानंतर महेशने आरडाओरडा केला यानंतर शेजारचे शेतकरी धावून आले त्यांनी तातडीने खासगी रुग्णालयात उपचारासाठी त्याला दाखल केले.

या घटनेची माहिती मिळताच वनविभागाचे वनपाल व्ही.टी. दाते वनरक्षक के.बी .बादरेत् यांनी रुग्णालयात येऊन महेशच्या प्रकृतीची चौकशी केली यावेळी व्ही .टी. दाते यांनी मगरीच्या हल्लयात जखमी झालेल्या महेशला शासकीय नियमानुसार नुकसान भरपाई देण्यात येईल असे सांगितले महेश अविवाहित असून त्याची आर्थिक परिस्थिती बेताची आहे. उपचारासाठी होणारा खर्च न पेलणारा असल्याने त्याला आर्थिक मदतीची गरज आहे. दोन वर्षांपूर्वी महेश चा डावा हात कटर मध्ये अडकून मनगटापासून तुटला आहे अशातच त्याच्यावरील या आघातामुळे ग्रामस्थांतून हळहळ व्यक्त होत आहे.




Scanned with CamScanner

एक निर्भिड गर्जना समाजातील प्रत्येकाची....
प्रत्येकातील माणसाची.....

## संपादकीय

# ईश्वर रुप

*त्या ईश्वरास परत जाऊन मिळण्याचे एकुण दोन मार्ग आहेत.एक भक्तिमार्ग व दुसरा ज्ञानमार्ग होय.या दोन्ही मार्गाने तो मानव ईश्वर रुपात समरस होतांना त्या साधकाला जगासंबंधीची साधारण धारणा टाकुन द्यावी लागते.या धारणेच्या निशेःष त्यागानेच मानवमन सर्व वृत्तारहीत होऊन अधिकारी होते.भक्तिमार्गातील सांधक ाने क्षणभंगुरत्व जाणलेले असले तरी जगतकर्त्या निर्मात्यावर त्याचा विश्वास असतो म्हणुन ईश्वराच्या कोणत्या तरी एका रुपावर प्रेम करुन त्याचे ध्यान करत तन्मय होणे व ईश्वराचपर्णबुध्दीने सर्व कर्मे करण्यात त्याचे मन रमते.भक्तिमार्गातील सांधक ईश्वराचे ध्यान करतांना प्रथम त्याची सर्वच मुर्ती आपल्या मनःपशुसमोर आणु शकत नाही कधीच त्याचा हात,कधी पाय,कधी मुख असे एक एक अवयव त्याच्या डोळ्यासमोर येतात ते पण काही क्षणच,लगेच ते नाहीसे होतात.फार वेळ स्थीर रहात नाहीत. अभ्यासाने म्हणजेच चिकाटीने ध्यानसांधना करता करता त्याला जमु लागते,म्हणजेच हळुहळु सार्वांग सुंदर संपुर्ण मुर्तीच्या मनःचक्षुसमोर स्थिर राहु शकते.ध्यान जसजसे अधिकाधिक तन्मयतेने होऊ लागते,तसतसा त्या मुर्तीत त्याला जीवंतपणा दिसु लागतो.ती हसत आहे,बोलत आहे असे दिसुन अखेरीज ती त्या सांधक मानवाला स्पर्शही करते आहे असे दिसते.तेव्हा मात्र तो मुर्ती जिवंत आहे याविषयी त्याला मुळीच शंका रहात नाही.नंतर तर तो सांधक डोळे मिटुन अथवा उघडुन कशाही अवस्थेत त्या मुर्तीचे स्मरण करताच,तो तिला पाहु शकतो.नंतर तर तो असे म्हणु लागतो की,माझी ईष्टदेवता वाटेल ते रुप घेऊ शकते,या विश्वासाच्या बळावर त्याला आपल्या ईष्टमुतीत नाना प्रकारच्या दिव्य रुपांचे दर्शन होते.अशा रितीने जिंवत मुर्तीच्या दर्शनाचा लाभ ज्या सांधकाला झालेला असतो त्याला जागृतावस्थेत दिसणाऱ्या पदार्थाप्रमाणे ध्यानकाली दिसणाऱ्या मुर्तीही तितक्याच सत्य आहेत असा प्रत्यक्ष अनुभव येतो.पण असा सांधक हा त्या ि दव्यमुर्तीचे अवडंबर न करता गोरगरीबांच्या मदतीसाठी प्रयत्न करतो. ईश्वररुपास मिसळुन जाण्याचा दुसरा मार्ग म्हणजे ज्ञानमार्ग होय.या ज्ञानमार्गातील सांधक हा जरी मानवच असला तरी तो या जगात ज्यावेळी जन्म घेतो,त्यावेळी सर्वज्ञ होऊनच अवतरतो.यालाच आपण अवतारी पुरुष म्हणतो.ज्ञानमार्ग सांधनेतील सांधक जर अवतारी पुरुष मानला जातो,म्हणजेच तो प्रत्यक्ष परमेश्वरच असतो.तर मग त्याला दुःख हे कसले माहितच नसणार असे आपण म्हणणार.व हे एका अर्थी बरोबर पण आहे.परंतु परमेश्वर जेव्हा नरदेह धारण करतो तेव्हा त्यास मानव देहाच्या असंपणतेप्रमणे म नाचीही असंपुर्णता स्वीकारली लागते.याचेच उदाहरण द्यावयाचे म्हणजे बावनकशी सोन्याचे नक्षीदार मोहक दागिने जर बनवायचे असतील तर त्यामध्ये इतर धातु मिसळल्याशिवाय ते नीट घडु शकत नाहीत,तसेच प्रत्यक्ष परपेश्वर सुध्दा कोणालाही भेटताना नरदेह घेऊनच भेटतो.त्यावेळी त्याला त्या नरदेहाचे सर्व दोष गुण स्विकारल्याशिवाय या जगात अवतार घेताच येत नाही.ज्ञानमार्गातील सांधक म्हणजे प्रत्यक्ष परमेश्वरच होय.तो ज्यावेळी नरदेह धारण करुन या स्वतःच निर्माण केलेल्या जगात प्रवेश करतो त्यावेळी तो प्रथम सर्वसामान्य मानवाप्रमाणे जीवन जगत असतो.त्याला संपुर्ण विश्वाचे ज्ञान माहित असुनसुध्दा अज्ञानाप्रमाणे वावरत असतो.या जगात अवतरल्यानंतर सुध्दा तो एखाद्या देवतेची मनोभावाने पुजा करुन त्यास प्रसन्न केल्याचे नाटक हुबेहुब वटवतो.याचे कारण एवढेच की,आपण स्वतःनिर्माण केलेले विश्व कालांतराने अंदाधुदी,अनाचार,अत्याचार व मी पणाच्या दांभिकतेने भरलेले असलेमुळे त्याला पुर्वपदावर आणण्यासाठी त्या सत्तांध व अत्याचारी मानवाच्या मनात ईश्वराविषयी भिती निर्माण करुन जनतेच्या मनात ईश्वराविषयी प्रिती निर्माण करणे एवढे महत्वाचे कार्य तो ज्ञानमार्गाने सांधकबरोबर सांधतो.प्रजा दक्ष राजा जसा वेष बदलुन आपल्या नगरीतील लोकांच्या मनातील दुःखे जाणुन घेण्यासाठी राज्यात फेरफटका मारुन नगरवासियांना सुखी ठेवतो तद्वतच कार्य ज्ञानमार्गी सांधक म्हणजेच अवतारी पुरुष करत असतो. ॅग्रेसच्या नेतृत्वाखालील आघाडी सरकारच्या काळात झालेला सिंचनाचा भ्रष्टाचार बाहेर काढू अशी घोषणा करून राज्यात सत्तेवर आलेल्या भाजपने सुमारे दोन वर्षांनी याबाबत कोणता तरी ठाम निर्णय घेतला आणि गैरव्यवहाराम ुळे संशयाच्या भोवऱ्यात अडकलेल्या १४ पाटबंधारे प्रकल्पांच्या ९४ निविदा रद्द केल्या. गेल्या काही काळात भ्रष्टाचारविरोधी विभागामार्फत याबाबत कारवाई सुरू असली तरी छापे टाकणे किंवा तपासणी करणे, यापलीकडे भरीव धोरणात्मक असे काहीच घडत नव्हते, त्यामुळेच सुमारे ६ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त रकम ेच्या निवीदा रद्द करणे हा महत्त्वाचा निर्णय मानावा लागेल. गेल्या १० वर्षांच्या काळात या विषयावरून जे राजकीय युध्द खेळले जात होते, त्यामध्ये एक म हत्त्वाची चढाई करून भाजपने राष्ट्रवादी काँग्रेसला शह देण्याचा प्रयत्न केला आहे, हाच याचा अर्थ. कारण हा निर्णय काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसला विशेषतः माजी उपमुख्यमंत्री अजित पवार आणि माजी पाटबंधारे मंत्री सुनील तटकरे यांच्यासाठी मोठा धक्का मानला जात आहे. कारण मुळातच एका सिंचन प्रकल्पातील गैरव्यवहार प्रक जनतेला तेच अपेक्षित आहे.*

---



# युग पुरुष छत्रपती शिवाजी महाराज

**क्रमश:** झाडाझुडुपांमध्ये दडून बसलेल्या मावळ्यांनी हल्ला करून खानाच्या सैन्याची दाणादाण उडविली. खानाचा मुलगा फाजलखान आणि इतर काही सरदार लपूनछपून वाईच्या मुख्य छावणीपर्यंत आले. इथे खानाचा जनाना होता. ते पाठलागावर असलेल्या नेताजीच्या सैन्यापासून वाचण्यासाठी खजिना, हत्ती व इतर जड सामान टाकून विजापूरला जनान्यासकट पळाले.

शिवाजीराजांना जनतेत मिळालेला आदर आणि प्रेम अनेक शतकांनंतरही टिकून आहे त्यामागचे त्यांची सहिष्णू वृत्ती हे फार महत्त्वाचे कारण आहे. अफझलखानाच्या मृत्यूनंतर त्यांनी त्याच्या शवाचे अंत्यसंस्कार इस्लामी पद्धतीने करून त्याची एक कबर प्रतापगडावर बांधली आणि त्या कबरीच्या कायम देखभालीची व्यवस्था केली.

अफझलखानच्या मृत्यूनंतर शिवाजीराजांनी दोरोजी नावाच्या सरदाराला कोकणपट्ट्यातील आणखी किल्ले आणि प्रदेश जिंकण्यास पाठवले. स्वतः राजे सातारा प्रांतात घुसून कोल्हापूरापर्यंत गेले व त्यांनी पन्हाळा जिंकून घेतला. नेताजीने त्याच्या सैन्यासह जवळपास विजापुरापर्यंत धडक मारली.

पहा प्रतापगडची लढाई

सिद्दी जौहरचे आक्रमण

अफझलखानच्या मृत्यूमुळे चिडलेल्या आदिलशहाने त्याचा सेनापती सिद्दी जौहर यास सर्व शक्तीनिशी हल्ला करण्याचा आदेश दिला. इ.स. १६६० साली झालेले हे आक्रमण स्वराज्यावरील अनेक मोठ्या संकटांपैकी एक समजले जाते. त्यासुमारास शिवाजीराजे मिरजेच्या किल्ल्याला वेढा घालून होते. सिद्दीच्या आक्रमणाची बातमी येताच राजे पन्हाळगडावर गेले आणि सिद्दी जौहरला त्याचा सुगावा लागताच त्याने गडालाच वेढा घातला आणि गडाची रसद तोडली. काही दिवस गडावरील सर्वांनी तग धरली पण सिद्दीचा वेढा उठण्याचे काही लक्षण दिसेना तेव्हा सर्वांशी खलबत करून शिवाजीराजांनी जवळच्या विशालगडावर पोहोचावे असा निर्णय घेतला. पन्हाळगडावरून एके रात्री शिवाजीराजे आणि काही मंडळी गुप्त रस्त्याने शिताफीने निसटले. ह्याचा पत्ता लागताच सिद्दी जौहरने सिद्दी मसऊदच्या बरोबर काही सैन्य पाठलागावर रवाना केले.

घोडखिंडीतली लढाई

पन्हाळगडापासून काही अंतरावर वाटेत सिद्दीच्या सैन्याने त्यांना घोडखिंडीत गाठले आणि हातघाईची लढाई सुरू झाली. तेव्हा शिवाजीराजांचे विश्वासू पराक्रमी सरदार बाजी प्रभु देशपांडे यांनी शिवाजीराजांना विनंती केली की त्यांनी विशालगडासाठी पुढे कूच करावी आणि खिंडीतील लढाई स्वतः लढतील. विशालगडावर पोहोचताच तोफांच्या तीन डागण्या ऐकू आल्या म्हणजे शिवाजीराजे सुखरूप गडावर पोहचले असा संदेश मिळेल. बाजी प्रभु देशपांड्यांनी वचन दिले की जो पर्यंत तोफांचे तीन आवाज ऐकू येणार नाहीत तो पर्यंत सिद्दी जौहरला खिंडीमद्ध्येच झुंजवत ठेवतील. शिवाजीराजांना ते पटेना पण 'बाजी'च्या विनंतीवजा हट्टापुढे त्यांनी यास मान्यता दिली आणि विशालगडासाठी कूच केले. बाजींनी सिद्दीच्या सैन्याला रोखून धरण्यासाठी प्रयत्नांची शर्थ केली, पण संख्येने कितीतरी पटीने अधिक सैन्यापुढे बाजीप्रभूंनी प्राणांची बाजी लावली. ते स्वतः प्राणांतिक रीतीने घायाळ झाले होते. शेवटी सैनिकांनी मृत्युपथावर असलेल्या घायाळ बाजींना एके ठिकाणी आणून बसविले, पण बाजींचे प्राण कानाशी साठले होते. थोड्या वेळाने तोफांचे तीन आवाज ऐकू आले आणि शिवाजीराजे गडावर पोहोचल्याचा तो संदेश समजल्यावरच बाजी प्रभु देशपांडे यांनी प्राण सोडले. शिवाजीराजांना ही बातमी फार चटका लावून गेली. बाजीप्रभू हे ज्या घोडखिंडीत लढले आणि स्वतःच्या प्राणांचे बलिदान दिले त्या घोडखिंडीचे नाव शिवरायांनी पावनखिंड असे बदलले. बाजीप्रभूच्या बलिदानाने पावन झालेली ती पावनखिंड.

मुघल साम्राज्याशी संघर्ष

मुघल सत्तेशी संघर्ष हा शिवचरित्राचा व्यापक आणि अविभाज्य भाग आहे. तत्कालीन म ुघल साम्राज्य हे भारतातील सर्वांत बलाढ्य होते आणि औरंगझेब हा अतिशय कठोर आणि कडवा मुघल बादशहा दिल्ली येथे शासन करीत होता.

शाहिस्तेखान प्रकरण

मुघल साम्राज्याचा नर्मदा नदी पलीकडे विस्तार तसेच शिवाजी महाराजांच्या राज्यविस्ताराला वेसण घालणे या दोन हेतूंसाठी औरंगझेबाने त्याचा मामा शाहिस्तेखान याला दख्खनच्या मोहिमेवर पाठविले. प्रचंड मोठा लवाजमा, सैन्य आणि फौजफाटा सोबत घेऊन शाहिस्तेखान निघाला आणि वाटेत असणार्या प्रत्येक राज्यात, गावात त्याने दहशत पसरवीत जमेल तेवढा जमेल तेथे विध्वंस केला. शेवटी पुण्याजवळील चाकणचा किल्ला जिंकून पुण्यातील शिवाजीराजांच्या लाल महालातच तळ ठोकला. शिवाजीराजांनी खानाचा बंदोबस्त करण्यासाठी एक धाडसी निर्णय घेतला तो म्हणजे लाल महालात शिरून खानाला संपविण्याचा. लाल महालात आणि अवतीभोवती खडा पहारा असे आणि महालात शिरणे अतिशय जोखमीचे काम होते. एके रात्री लाल महालाजवळून जाणाऱ्या एका लग्नाच्या मिरवणुकीचा आधार घेऊन काही मोजक्या म ाणसांसह स्वतः शिवाजी महाराज लाल महालात शिरले. महालाचा कानाकोपरा माहीत असल्यामुळे लवकरच प्रत्यक्ष शाहिस्तेखानच्या खोलीत शिवाजी महाराजांनी प्रवेश केला. तोपर्यंत महालात कोठेतरी झटापट सुरू झाल्यामुळे शाहिस्तेखानला जाग आली आणि तेवढ्यातच शिवाजीराजांना समोर पाहून खानाने जीव वाचविण्यासाठी सरळ खिडकीतून खाली उडी घेतली. शिवाजी महाराजांनी चपळाईने केलेला वार हुकल्यामुळे खानाच्या प्राणावर बेतण्याऐवजी त्याची तीन बोटे कापली गेली. या प्रकरणामुळे मुघल साम्राज्याची जी नाचक्की झाली ती स्वराज्यासाठी अधिकच फायद्याची ठरली. जे राजे मुघल आश्रयामुळे शिवाजी म हाराजांना जुमानत नसत ते आता शिवाजीराजांच्या पराक्रमामुळे त्यांच्या बाजूने झुकले. आणखी एक वेगळा परिणाम या प्रकरणामुळे झाला तो म्हणजे शिवाजीराजांना मिळालेला मानवी क्षमतेपेक्षा मोठा दर्जा आणि त्यामुळे जोडलेल्या दंतकथा. अनेकदा या गोष्टीचा अप्रत्यक्ष फायदा शिवाजी महाराज किंवा त्यांच्या सैन्याला मिळाला. शत्रुसैन्यामध्ये शिवाजी महाराज घुसल्याच्या केवळ अफवा पसरवून संख्येने किरकोळ असलेल्या म ावळ्यांनी संख्येने अनेक पटींनी म ोठ्या सैन्याची उडविलेली दाणादाण ही याच गोष्टीची साक्ष देऊ शकते. इ.स. १६६३ सालचे शाहिस्तेखान प्रकरण शिवाजीराजांच्या जीवनात आणखी एका नाट्यमय प्रसंगाची भर घालून गेले.

सुरतेची पहिली लुट

इ.स. १६६४. सततची युद्धे आणि त्यामुळे रिता होत असलेला खजिना यामुळे शिवाजीराजे चिंतीत होते. मुघलांना किंवा इतर सुलतानांना ही चिंता फार सतावीत नसे. अन्याय्य कर लादून किंवा बळजबरीने खंडणी जनतेकडून वसूल करण्यात बादशाही कारभारास कमीपणा वाटत नव्हता. अनेक दिवसांच्या खलबतांनंतर शिवाजीराजांनी शेवटी एक उपाय शोधून काढला तो म्हणजे इतिहासाला माहीत असलेली सुरतेची पहिली लूट. आजच्या गुजरात राज्यातील सुरत शहर हे तत्कालीन मुघल राज्यात होते आणि व्यापारामुळे अतिशय श्रीमंत शहरांमध्ये गणले जात होते. सुरत शहराच्या लुटीमुळे दोन गोष्टी साध्य करता आल्या, एक म्हणजे मुघल सत्तेला आव्हान आणि राज्याच्या खजिन्यात भर. लुटीचा इतिहास भारतामध्ये अतिशय रक्तरंजित आणि विनाशक आहे. त्या पार्श्वभूम ीवर सुरतेची लुट ही पूर्णपणे वेगळी जाणवते. शिवाजीराजांच्या आज्ञेनुसार स्त्रिया, मुले आणि वृद्ध यांच्या केसालाही धक्का न लावता ही लुट केली गेली. मशिदी, चर्च यासारख्या देवस्थानांनाही लुटीतून संरक्षण दिले गेले.

मिर्झाराजे जयसिंह प्रकरण

इ.स. १६६५. औरंगझेबाने त्यांचे पराक्रमी सेनापती मिर्झाराजे जयसिंह याला प्रचंड सैन्यासह पाठविले. शिवाजीराजांचा प्रतिकार थिटा पडला आणि निर्णायक लढाईनंतर पुरंदरचा तह झाला आणि शिवाजीराजांना तहाच्या अटींनुसार २३ किल्ले द्यावे लागले. त्याबरोबरच स्वतः आग्रा (तत्कालीन मुघल राजधानी) येथे पुत्र संभाजी यासह औरंगझेबासमोर हजर होण्याचे कबूल करावे लागले.

आग्र्याहून सुटका

शिवाजी महाराजांना महाराष्ट्रात दैवत मानतात

इ.स. १६६६ साली औरंगझेबाने शिवाजीराजांना दिल्ली येथे भेटीसाठी आणि विजापूरवर त्यांनी केलेल्या आक्रमणावर चर्चा करण्यास बोलाविले. त्यानुसार शिवाजीराजे दिल्लीला पोहोचले. त्यांच्यासोबत नऊ वर्षांचा संभाजी देखिल होता. परंतु दरबारात त्यांना कनिष्ठ सरदारांच्या सम वेत उभे करून शिवाजीसारख्या राजांचा उपमर्द केला. या अपम ानामुळे अतिशय नाराज होऊन शिवाजीराजे तडक दरबाराबाहेर पडले असता त्यांना तत्क्षणी अटक करून नजरकैदेत ठेवण्यात आले. लवकरच त्यांची रवानगी जयसिंहाचे पुत्र मिर्झाराजे रामसिंग यांच्याकडे आग्रा येथे करण्यात आली. शिवाजीबद्दल आधीपासूनच धास्ती असल्यामुळे त्यांच्यावर कडक पहारा ठेवला होता. काही दिवस निघून गेले. सुटकेसाठी प्रयत्न फोल ठरले होते. शेवटी शिवाजीराजांनी एक योजना आखली. त्या योजनेनुसार त्यांनी आजारी पडल्याचे निमित्त केले आणि त्यांच्या प्रकृतीस्वास्थ्यासाठी विविध मंदिरांना मिठाईचे पेटारे पाठविण्यात येऊ लागले. सुरूवातीला पहारेकरी प्रत्येक पेटारा बारकाईने तपासून पहात पण काही दिवसांनी यात ढिलाई होऊ लागली. नंतर त्यांनी तपासण्याचेदेखील सोडले. या गोष्टीचा फायदा घेऊन एक दिवस शिवाजीराजे आणि संभाजी एकेका पेटार्यामध्ये बसून निसटण्यात यशस्वी झाले. कोणास संशय येऊ नये यास्तव शिवाजीराजांचा विश्वासू हिरोजी फर्जंद हा शिवरायांचे कपडे चढवून आणि त्यांची अंगठी दिसेल अशा पद्धतीने हात बाहेर काढून झोपल्याचे नाटक करीत होता. शिवराय दूरवर पोहोचल्याची खात्री आल्यावर तो देखिल पहारेकर्यांना बगल देऊन निसटला. बराच वेळ आतमध्ये काही हालचाल नाही हे वाटून पहारेकरी आत गेले असता त्यांना तेथे कोणीही आढळले नाही तेव्हा त्यांना सत्य परिस्थिती सम जली.

आग्रा येथून शिवाजीराजांनी वेषांतर केले आणि एका संन्याशाच्या वेषात महाराष्ट्रात प्रवेश केला. त्यातदेखील त्यांना अनेक खबरदार्या घ्याव्या लागल्या. संभाजीला त्यांनी वेगळ्या मार्गाने काही दुसर्या विश्वासू माणसांबरोबर पाठविले होते. ते स्वतः अतिशय लांबच्या आणि तिरकस, वाकड्या मार्गाने मजल-दरमजल करीत आले. उद्देश हाच होता की काही झाले तरी पुन्हा औरंगझेबाच्या हातात पडायचे नाही.

यात आणखी एक गोष्ट उल्लेखनीय आहे. दिल्लीभेटीपूर्वी त्यांनी राज्यकारभारासाठी जे अष्टप्रधानमंडळ स्थापले होते, त्या मंडळाने राजांच्या अनुपस्थितीम ध्ये देखिल राज्याचा कारभार चोख चालविला होता. हे शिवाजीराजांचे आणि अष्टप्रधानमंडळाचे फार मोठे यश आहे.

Scanned with CamScanner

# क्षेत्रामध्ये तुम्ही आहात त्या क्षेत्रातील छत्रपती शिवाजी महाराज बना– खास. धैर्यशील माने

## एबीपी शिक्षण समुहाचा पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात



**कोडोली (प्रतिनिधी) ज्या ज्या क्षेत्रामध्ये तुम्ही आहात त्या क्षेत्रातील छत्रपती शिवाजी महाराज बना स्वप्न फक्त बघू नका तर ती सत्यात उतरवा असे प्रतिपादन खास. धैर्यशील माने यांनी केले. नवे पारगाव (ता.हातकणंगले) येथील एबीपी शिक्षण समुह संचलित वारणा विद्यानिकेतन व आबासाहेब पाटील जुनियर कॉलेज ऑफ सायन्स विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धेत मिळविलेल्या यशाबद्दल सत्कार व पारितोषिक वितरण समारंभ प्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष ए. बी .पाटील होते प्रस्ताविक सचिव अमोल कुमार पाटील यांनी केले.**

यशस्वी खेळाडू –नेपाळ येथे झालेल्या भारतीय मिशन ऑलंपीक गेम्स असोसिएशन ऑफ इंडिया आंतरराष्ट्रीय स्पर्धे तील कबड्डी या खेळा मधील विजेते– टीम इंडियाचे नेतृत्व करणारा हर्षवर्धन पाटील, अक्षय सावंत, श्रेयस पाटील (सुवर्णपदक )खो–खो– ओमकार शेलार, प्रतीक तारदाळ (सुवर्णपदक )हॉलीबॉल –आदित्य कुंभार (सुवर्णपदक )अथलेटिक्स –ऋषिकेश मोहिते, मंदार शिंदे, ऋषिराज भोसले( रौप्य पदक) गोवा येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय तायक्कांदो स्पर्धेतील विजेते– शिवराज ठोंबरे ,आदेश जाधव, विराज गोडसे ,साहिल यादव, शुभम खरात, अनुज जाधव, हर्षदा पाटील (सुवर्णपदक ) तर आर्चरी क्रीडाप्रकारात ईशा पाटील हिने राज्यस्तरीय प्रथम क्रमांक मिळवला तसेच जानेवारी जेईई मेन्स २० २० मध्ये झालेल्या जेईई मेन्स या परीक्षेत हर्षद नेजे, अभिजीत ठोंबरे ,ऋग्वेद चौगुले, सौरभ नलवडे या विद्यार्थ्यांनी यश मिळवले वरील सर्व यशस्वी खेळाडू व विद्यार्थ्यांचा खास.धैर्यशील माने यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमास शिवसेना तालुकाप्रमुख राजेंद्र पाटील, उदयसिंह शिंदे प्रतिष्ठित नागरिक सुभाष भापकर, उदय चाळके, सचिवा सौ आर.ए.पाटील, अध्यक्षा कांचन पाटील सर्व संचालक उपस्थित होते सूत्रसंचालन सौ पाटील व जगताप मॅडम यांनी केले.

# दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी 'शिक्षणदिन'– शालेय शिक्षणमंत्री

**मुंबई (प्रतिनिधी) शाळा न्यायाधिकरणाच्या अधिकार क्षेत्रात न येणाऱ्या तक्रारींवर कार्यवाही करण्यासाठी सद्यस्थितीत औपचारिक व्यवस्था नसल्यामुळे तक्रारींचे निराकरण तातडीने व्हावे, या उद्देशाने राज्य सरकारने शाळा, जिल्हा आणि विभागीय स्तरावर तक्रार निवारण समिती स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच प्रत्येक शाळांमध्ये तक्रार पेटीही बसविण्यात येणार असून या तक्रारींचे तातडीने निराकरण करण्यासाठी लोकशाही दिनाच्या धर्तीवर दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी शिक्षण दिनाचे आयोजन करण्यात येणार आहे, अशी माहिती शालेय शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांनी दिली.**

सध्या शाळेतील असुविधांपासून ते विविध प्रशासकीय कामांबाबत तक्रार निवारणासाठी कोणतीच यंत्रणा अस्तित्वात नाही. यामुळे अनेकदा ग्रामीण भागांतील शाळांना शहरात येऊन तक्रारी कराव्या लागत. याचबरोबर अनेकदा या तक्रारींचा निपटाराही होत नसल्यामुळे अनेक समस्या वेळेत सोडविल्या जात नव्हत्या. या तक्रारी भविष्यात वेळेवर सोडविल्या जाव्यात यासाठी तक्रारी पेटीची योजना आखण्यात आली आहे. तसेच शाळा स्तरावर मुख्याध्यापक आणि शिक्षकांचा समावेश असलेली तक्रार निवारण समिती असेल. यामध्ये विद्यार्थ्यांनी केलेल्या तक्रारींचे, शिक्षकांच्या तक्रारींचे निराकारण करण्यात येणार आहे. जिल्हा स्तरावर तक्रार निवारण समिती असून यात जिल्हा शिक्षण अधिकारी/ शिक्षण निरीक्षक, गटशिक्षणाधिकारी कार्यरत असतील. तसेच विभागीय स्तरावर उपसंचालकांच्या अध्यक्षतेखाली तक्रार निवारण समिती स्थापन करण्यात येणार आहे.

# वारणा साखर चे संचालक प्रकाश पाटील यांचे निधन



**कोडाली (प्रतिनिधी) वारणानगर येथील श्री तात्यासाहेब कोरे वारणा सहकारी साखर कारखान्याचे ज्येष्ठ संचालक. सांगली जिल्ह्यातील ऐतवडे खुर्द ता. वाळवा येथील विविध सर्व सहकारी संस्थांचे ज्येष्ठ मार्गदर्शक आनंदराव उर्फ प्रकाश पाटील (दादा) (वय ६२) नुकतेच हृदयविकाराच्या धक्याने निधन झाले त्यांच्या निधनाने वारणा परिसरावर शोककळा पसरली ऐतवडे खुर्द येथे अंत्ययात्रा काढून त्यांच्यावर अत्यंसंस्कार करण्यात आले.**

वारणा साखर कारखान्याचे माजी व्हा. चेअरमन, सांगली जिल्हा बँकेचे अध्यक्ष स्वर्गीय साहित्यप्राज्ञ बाजीराव बाळाजी पाटील यांचे ते जेष्ठ चिरंजीव, राज्य सहकारी संघाचे अध्यक्ष डॉ. प्रताप पाटील यांचे ज्येष्ठ बंधू होत.

प्रकाश पाटील हे ऐतवडे खुर्द मधील विविध विकास सहकारी संस्थांचे ज्येष्ठ मार्गदर्शक, तसेच सांगली जिल्हा सहकारी बोर्ड, गुलाबराव पाटील ट्रस्ट, सांगली मुद्रणालय, पश्चिम महाराष्ट्र सहकारी मंडळाचे विश्वस्त अशा विविध पदावर ते विश्वस्त म्हणून कार्यरत होते, त्यांनी राजारामबापू, दत्त शिरोळ सहकारी साखर कारखान्यात शेती अधिकारी म्हणून उत्कृष्ट काम केले होते. ते मनमिळावू स्वभावाचे होते त्यांच्या निधनाने विविध संस्थेवर मार्गदर्शकाची पोकळी निर्माण झाली असून त्यांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला असल्याची भावना व्यक्त होत आहे.

त्यांच्या पश्चात आई, पत्नी,एक मुलगा, मुलगी, सुन नातवंडे, दोन भाऊ असा परिवार आहे.

## मुलांमधील दृष्टीदोष निवारण्यासाठी मोफत चष्मे

**मुंबई (प्रतिनिधी) राज्यातील सर्व शासकीय व अनुदानीत शाळांमधील ६ ते १८ वर्षे वयोगटातील मुलांमधील दृष्टीदोष निवारण्यासाठी त्यांना मोफत चष्मे पुरविण्यास राज्य सरकारच्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.**

या योजनेसाठी सुमारे २० कोटी रुपये अनावर्ती व ५ कोटी रुपये आवर्ती खर्च अपेक्षित आहे.

सध्या केंद्र शासनाच्या राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत शालेय मुलांची वर्षातून एकदा आरोग्य तपासणी करण्यात येते. या वर्षात ११९५ वैद्यकीय पथकं यासाठी कार्यरत असून त्यांच्या तपासण्यात दृष्टीदोषाचे प्रमाण वाढलेले आढळले आहे. शाळांमध्ये १ कोटी २१ लाख ६७ हजार ५८५ इतकी मुलं शिकत असून दृष्टीदोषाचे प्रमाण ८ टक्के इतके आहे. या मुलांना चष्मे उपलब्ध करून दिल्यास एकूणच त्यांच्या शैक्षणिक प्रगतीत सुधारणा होईल. एका चष्म्याची सरासरी किंमत २०० रुपये असून २५ टक्के विद्यार्थ्यांचा चष्म्याचा नंबर पुढील वर्षात बदलण्याची शक्यता असल्याने त्यासाठी देखील खर्च अपेक्षित आहे. या पार्श्वभूमीवर सार्वजनिक आरोग्य विभागातर्फे दृष्टीदोष असलेल्या मुलांना निश्चित करण्यात आलेल्या पुरवठादाराकडून त्याच्या घरी अथवा शाळेत मोफत चष्मा पोहचविण्यात येणार आहे.

# ट्रक टर्मिनलसाठी महापालिकेच्या ताब्यातील जागेचा वापर करावा – पालकमंत्री सतेज पाटील



**कोल्हापूर (प्रतिनिधी) तावडे हॉटेल येथील महापालिकेच्या ताब्यात असणारी जागा ट्रक टर्मिनलसाठी वापरात आणावी, आशा सूचना पालकमंत्री सतेज ऊर्फ बंटी पाटील यांनी दिली.**

ट्रक टर्मिनलसाठी तावडे हॉटेल येथील जागेची, बस टर्मिनलसाठी शिरोली जकात येथील जागेची तसेच व व्हीनस कॉर्नल येथील गाडी अड्डा येथील पाहणी पालकमंत्री सतेज पाटील यांनी केली.

यावेळी आमदार चंद्रकांत जाधव, आमदार ऋतुराज पाटील, महापौर निलोफर आजरेकर, उप महापौर संजय मोहिते, महापालिका आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी, शहर अभियंता नेत्रदीप सरनोबत उपस्थित होते.

पालकमंत्री श्री. पाटील यांनी तावडे हॉटेल येथील ट्रक टर्मिनलची पाहणी केली. यावेळी २३ एकर पैकी तीन ते साडेतीन एकर महापालिकेच्या ताब्यात असणाऱ्या साडेतीन एकर जागेची साफ सफाई जेबीसीच्या सहाय्याने करावी. या जागेत असणारे पीक निघाल्यानंतर तीची साफ सफाई करुन जागा वापरात घ्यावी. या जागेवर किमान १०० ट्रक थांबू शकतील. त्यासाठी अनुदान उपलब्ध करुन दिले जाईल.

शिरोली जकात नका येथील बस टर्मिनलसाठी असलेली जागा जेसीबी व रोलरने साफ सफाई करुन घ्यावी व बस टर्मिनलसाठी जागा वापरात आणावी, असे ही ते म्हणाले.

व्हीनस कॉर्नल येथील गाडी अड्ड्याची पाहणीही त्यांनी केली. येथे काम चालू झाल्यांनतर येथील गाळे धारकांची पर्यायी व्यवस्था २३ एकर जागेत होवू शकते, असेही ते म्हणाले.

# नवोदित डॉक्टरांनी रुग्णांची मनोभावे सेवा करावी – राज्यमंत्री राजेंद्र पाटील–यड्रावकर




**कोडोली (प्रतिनिधी) आरोग्य सेवेत येणाऱ्या नवोदित डॉक्टरांनी परिपूर्ण अभ्यास करून रुग्णांची मनोभावे सेवा करावी तसेच वैद्यकीय क्षेत्रात नवीन संशोधनावर भर दिला पाहिजे असे प्रतिपादन सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री डॉ राजेंद्र पाटील–यड्रावकर यांनी केले.**

यशवंत आयुर्वेदिक महाविद्यालयाच्या प्रांगणात झालेल्या पदवीप्रदान समारंभ प्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव डॉक्टर जयंत पाटील होते ग्रंथदिंडी पूजन व दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली.

संस्थेचे सचिव डॉ.जयंत पाटील यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करीत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या उपस्थित सर्व मान्यवरांचे डॉ. जयंत पाटील यांनी स्वागत केले यावेळी पदवी प्राप्त ८१ विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पदवी प्रमाणपत्र देण्यात आले .तसेच डी.लिट. पदवी प्राप्त शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. प्राचार्य मिलिंद गोडबोले यांनी महाविद्यालयाच्या प्रगतीचा आढावा घेतला.

यावेळी अद्यावत अशा पंचकर्म विभागाचे उद्घाटन राज्यमंत्री डॉ. पाटील यांच्या हस्ते करण्यात आले .एक दिवस या पंचकर्म सेंटर मध्ये येऊन दिवसभर सेवा घेणार असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमास संस्थेच्या विश्वस्त विनिता पाटील, अंजना रेडकर, सर्वोदय सोसायटीचे चेअरमन लक्ष्मणराव कुलकर्णी, डॉ. ग्रामोपाध्ये डॉ. के विशाला, डॉ. एस. जी. कुलकर्णी, सचिव वसंत पाटील, माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष डॉ. सुनील कोळेकर उपस्थित होते .प्रस्ताविक डॉ. अभिजित इंगवले यांनी तर सूत्रसंचालन डॉ. पुरुषोत्तम काळे यांनी केले डॉ. आद्रा थोरात यांनी आभार मानले.

# अडचणीसाठी थेट फोन करा, पण उठावदार काम झालं पाहिजे – वित्त व नियोजन राज्यमंत्री शंभुराज देसाई



**कोल्हापूर (प्रतिनिधी) जिल्ह्याचे विकासात्मक काम करताना काही अडचणी आल्यास मला थेट फोन करा. निश्चितपणे त्या सोडविल्या जातील. परंतु उठावदार काम झालं पाहिजे, अशी सूचना वित्त व नियोजन राज्यमंत्री शंभुराज देसाई यांनी दिली.**

शासकीय विश्रामगृहात गृह, वित्त व नियोजन, उत्पादन शुल्क, कौशल्य विकास व पणन विभागाच्या अधिकाऱ्यांची आज आढावा बैठक घेतली. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी दौलत देसाई, महापालिका आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी, पोलीस अधीक्षक डॉ. अभिनव देशमुख, उत्पादन शुल्क अधीक्षक गणेश पाटील, जिल्हा नियोजन अधिकारी सरिता यादव आदी उपस्थित होते.

राज्यमंत्री श्री. देसाई यांनी विभाग निहाय आढावा घेतला. यामध्ये प्रामुख्याने झालेली तरतुद, झालेला खर्च यांचा समावेश होता. जिल्हा नियोजन अधिकारी श्रीमती यादव, समाज कल्याणचे सहायक आयुक्त बाळासाहेब कामत यांनी यावेळी त्याबाबत माहिती दिली. जिल्ह्यामध्ये एकूण किती आयटीआय आहेत त्याबाबतची सद्यस्थिती या विषयी त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना माहिती विचारली. अकार्यक्षम संस्था बंद करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी कौशल्य विकास विभागाला दिल्या. ते म्हणाले, ग्रामीण भागात युवकांना सक्षम करण्यासाठी कौशल्य विभागाने प्रभावीपणे अंमलबजावणी करावी. लवकरच सांगली, सातारा आणि कोल्हापूर या तीन्ही जिल्ह्यांसाठी एकत्रित बैठक लावली जाईल.

जिल्ह्यासाठी गतवर्षी पेक्षा ६० कोटीचा वाढीव निधी दिला आहे. जिल्ह्यात विकासाचं काम चांगलं होईल या दृष्टीने अधिकाऱ्यांनी काम करावे. त्यासाठी मी तुम्हाला शुभेच्छा देतो, असेही ते म्हणाले.

वारणेचा वाघ फौंडेशनच्या
माध्यमातून
स्व. चि. केदार प्रविण
पाटील(आबा) यांच्या स्मरणार्थ
अपघातग्रस्तांसाठी विनामूल्य व
इतरांसाठी अत्यल्प दरात रुग्णवाहिका




आपत्कालिन संपर्क
९८२२८४००३९, ९९७५५०९९३९

Scanned with CamScanner

# जोतिर्लिंग पब्लिक स्कूल येथे शिवजयंती निमित्त गोरक्षनाथ कालेकर यांचे व्याख्यान संपन्न



**कोडोली (प्रतिनिधी) जोतिर्लिंग पब्लिक स्कूल व विद्यानिकेतन माले तालुका पन्हाळा येथे शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.**

शिवजयती निमीत्त सकाळी नववीच्या विद्यार्थ्यांनी पन्हाळ गडावरून ज्योत आणली. त्यानंतर संस्थेचे संस्थापक एस. ए .कळंत्रे व कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे गोरक्षनाथ कालेकर यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष गोरक्षनाथ कालेकर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले की विद्यार्थ्यांकडे विद्या हे महत्त्वाचे शस्त्र असून त्याचा वापर त्यांनी स्वतःच्या विकासासाठी करून घ्यावा व आधुनिक मावळे बनून राष्ट्राचे व देशाचे नाव मोठे करावे. या नंतर त्यांनी बाजीप्रभू देशपांडे व वीर शिवा काशीद यांच्या इतिहासाला उजाळा दिला व विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

संस्थेचे संस्थापक एस. ए . कळंत्रे म्हणाले विद्यार्थ्यांनी धाडसी व चिकाटीने प्रयत्न केल्यास यश नक्की प्राप्त होते हे समजावून सांगितले.

यावेळी मुख्याध्यापिका सविता कळंत्रे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

वरद फडतरे, सुरज पोरे, प्रणिता सांगळे, सिद्धी बुणे , रोहित कळंत्रे , प्रथमेश शिंदे , या विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या बद्दल आपले विचार मांडले तर सोहम कालेकर याने शिवाजी महाराजांचा पोवाडा सादर केला.

विद्यार्थी जयदीप सांगळे याने छत्रपती शिवाजी महाराजांची तर यश कदम व सचिन पाटील यांनी मावळ्यांची वेशभूषा करून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

कार्यक्रम पार पाडण्यासाठी संस्थेचे संस्थापक एस .ए .कळंत्रे, मुख्याध्यापिका सौ एस. एस. कळंत्रे, उपमुख्याध्यापक एस. बी .रणभिसे, एस .एस. महापुरे,

सहाय्यक शिक्षक के. के .कांबळे, विनायक पाटील, महेश रुगे, रमेश वीर, तसेच इयत्ता सातवीचे विद्यार्थी या सर्वांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन नम्रता शिंदे हिने तर प्रास्ताविक शुभम आंबेकर याने केले व आभार वरद फडतरे याने मानले.

# अश्व व मेंढरांचे रिंगण सोहळ्याने कोडोलीतील पारायणाची सांगता.

**कोडोली(प्रतिनिधी ) येथील श्री नाथ वारकरी संप्रदाय सेवा मंडळ यांच्यावतीने १० फेब्रुवारी पासून सुरू असलेल्या पारायण सोहळ्याची सांगता उभे अश्व रिंगण, गोल अश्व रिंगण व मेंढरांच्या रिंगण सोहळ्याने झाली.**

येथील माऊली मंदिरामध्ये १० फेब्रुवारीपासून ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्यास विधिवत पुजा करून सुरुवात झाली होती. पारायण सोहळ्यात रोज प्रवचन, हरी भजन, कीर्तन असे कार्यक्रम पार पडले पारायण सोहळ्याचे हे पंचविसावे वर्ष होते.

पारायण सोहळ्याची सांगता शनिवार दिनांक १५ रोजी झाली .शनिवारी सायंकाळी माऊली मंदिर येथे कृष्णानंद शास्त्री व विलास भोसले यांच्या हस्ते अश्व पूजन करून दिंडी सोहळ्यास प्रारंभ झाला. दिंडी सोहळ्यात ३००पेक्षा अधिक वारकरी सहभागी झाले होते. यामध्ये महिलांची संख्या लक्षणीय होती .माऊली मंदिर येथून सुरू झालेला दिंडी सोहळा मुख्य रस्त्यावरून सर्वोदय चौक या ठिकाणी आला. येथे उभे अश्व रिंगण झाले तर दत्त मठी समोरील क्रीडांगणावर गोल अश्व व मेंढरांचे रिंगण पार पडले रिंगण सोहळ्यात दोन अश्व व१५० हून अधिक मेंढरे सहभागी होती. भाविकांनी माऊली माऊली असा जोरदार गजर करताच अश्वांनी व मेंढरानी गोल रिंगण भरधाव वेगाने पूर्ण केले.

सप्ताह समाप्तीनिमित्त दिंडी सोहळ्याच्या दुसऱ्या दिवशी माऊली मंदिर येथे महाप्रसादाचे आयोजन केले होते. याचा हजारो भाविकांनी लाभ घेतला निवृत्ती शिंणगारे, समाधान पाटील, विनायक पाटील, प्रवीण मोरे, शिवाजी पाटील, अजित काईंगडे, यांचेसह वारकरी मंडळी यांनी पारायण व रिंगण सोहळा यशस्वी करण्यास परिश्रम घेतले.

पान १ वरुन

## यापुढे पंचायत समित्यांनाही जादा अधिकार

परिषदेचे कामकाज अधिक पारदर्शी आणि लोकाभिमुख करावे. विकास कामामध्ये कसलीही हयगय खपवून घेतली जाणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला. तीन दिवसाच्या या क्रीडा स्पर्धामध्ये खेळाडूंनी खिलाडू वृत्ती जोपासून आपले नैपुन्य विकसित आणि वृंध्दीगत करावे, असे आवाहनही ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ यांनी केले.

**ग्रामीण भागाच्या विकासाचा चेहरा म्हणजे ग्राम विकास- पालकमंत्री**

ग्रामीण भागाच्या सर्वांगिण विकासामध्ये ग्राम विकास यंत्रणनेचे महत्वपूर्ण योगदान असल्याचे स्पष्ट करुन पालकमंत्री सतेज पाटील म्हणाले, ग्रामीण भागाच्या विकासाचा चेहरा म्हणून आज ग्राम विकास यंत्रणेकडे पाहिले जात आहे. ही यंत्रणा अधिक गतीमान आणि सक्षम करुन ग्रामीण भागाचा विशेषत: गावाचा सर्वांगिण विकास करण्यासाठी सर्वानीच कटिबध्द होवू या. महाराष्ट्रात पंचायत राज व्यवस्था अधिक सक्षम करण्यावर राज्य शासनाचा अधिक भर असून गावांना मोठा निधी आणि अधिकार प्राप्त झाले आहेत. या निधीचा योग्य पध्दतीने विनियोग करण्याच्या दृष्टीने पंचायत समितीस्तरवरही कुशल, तांत्रिक अधिकारी, कर्मचाऱ्यांची यंत्रणा निर्माण करणे गरजेचे असल्याचे ते म्हणाले.

जिल्हा परिषदेच्या वतीने आयोजित केलेल्या क्रीडा स्पर्धामुळे अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या कला गुणांना निश्चितपणे वाव मिळेल. या यंत्रणेतील अधिकारी कर्मचाऱ्यांनी जनतेची कामेही अधिक गतीमानतेने करावी, असे आवाहनही पालकमंत्री सतेज ऊर्फ बंटी पाटील यांनी केले.

प्रारंभी मुख्य कार्यकारी अधिकारी अमन मित्तल यांनी स्वागत करुन क्रीडा स्पर्धेची माहिती दिली. जिल्हा परिषदेचे अध्यक्ष बजरंग पाटील यांनी पाहुण्यांचा सत्कार करुन खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. सुरुवातीला दिपप्रज्वलन, क्रीडा ध्वजारोहण आणि क्रीडा ज्योत प्रज्वलनाने मंत्री महोदयांच्या हस्ते क्रीडा स्पर्धेचा प्रारंभ करण्यात आला. यावेळी मेन राजाराम हायस्कुलचे सहायक प्रा. बाबासाहेब माळवे यांनी खेळाडूंना क्रीडा शपथ दिली. खेळाडूंच्या संचलनाने क्रीडा स्पर्धेची शान वाढवली. शेवटी उप मुख्य कार्यकारी अधिकारी रविकांत आडसूळ यांनी आभार मानले. समारंभास विषय समित्यांचे तसेच पंचायत समित्यांचे सन्माननीय सभापती, खाते प्रमुख, जिल्हा परिषद सदस्य, सदस्या आणि अधिकारी, कर्मचारी आणि क्रीडा प्रेमी नागरिक उपस्थित होते.

या स्पर्धेमध्ये क्रिकेट, व्हॉलीबॉल, कबड्डी, खो-खो, धावणे, बॅडमिंटन, कॅरम, थाळी फेक, गोळा फेक अशा सांघिक व वैयक्तिक खेळांच्या स्पर्धा होणार आहेत. या स्पर्धामध्ये एकूण २५४० अधिकारी, कर्मचारी सहभागी झाले आहेत.

# जिल्ह्यात २९ फेब्रुवारीपर्यंत बंदी आदेश

**कोल्हापूर (प्रतिनिधी) शासकीय शिवजयंती व महाशिवरात्री हे सण, बहुजन आघाडीच्या वतीने सीएए व एनआरसी कायदा विरोधात २२ फेब्रुवारी रोजी होणारा मोर्चा, संविधान बचाव देश बचाव कृती समितीच्या वतीने २४ फेब्रुवारी रोजी आयोजित मोर्चा तसेच राज्याचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू होत असून या अधिवेशन कालावधीत विविध पक्ष, संघटना, व्यक्ती, समूह यांच्याकडून विविध मागण्या संदर्भाने मोर्चा, रॅली, उपोषण, आत्मदहन, धरणे इत्यादी प्रकारची संभाव्य आंदोलने तसेच जिल्ह्यातील विविध पक्ष, संघटनांकडून त्यांच्या विविध मागण्यांसाठी वारंवार होणारी आंदोलने या कारणांमुळे जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१)अ ते फ कलम ३७ (३) अन्वये दिनांक १९ फेब्रुवारी रोजी सकाळी ७ वाजल्यापासून दिनांक २९ फेब्रुवारी रोजी रात्री २४ वाजेपर्यात जिल्ह्यामध्ये बंदी आदेश जारी करण्यात येत आहे.**

कलम ३७ (१) अ ते फ

शस्त्रे, बंदुका, सोटा, तलवारी, भाले, सुऱ्या लाठी अगर काठी किंवा शारिरीक इजा करण्यासाठी वापरता येईल अशा कोणत्याही वस्तू बरोबर न नेणे. कोणताही ज्वालाग्राही पदार्थ अगर स्फोटके पदार्थ वाहून नेणे. दगड अगर तत्सम शस्त्रे साठविणे अगर सहज फेकून त्याचा मारणेसाठी उपयोग करणे. व्यक्ती अगर त्याच्या प्रतिमा यांचे प्रदर्शन दहन करणे. सार्वजनिक घोषणा करणे, गाणी म्हणणे आणि गाणी अथवा वाद्ये वाजविणे. असभ्य हावभाव करणे, ग्राम्यभाषा वापरणे, सभ्यता व नितीविरूध्द निरनिराळ्या जातीच्या नैतिक भावना दुखावल्या जाऊन त्यांच्यामध्ये भांडणे-बखेडे निर्माण होऊन शांततेस अगर सुव्यवस्थेस बाधा येईल अशी सोंगे अगर कोणताही जिन्नस तयार करणे व त्याचा प्रसार करून उपयोग करणे.

कलम ३७ (३)

कोल्हापूर जिल्ह्यामध्ये पाच अगर पाचहून जादा लोकांनी एकत्र जमा होणे, जमाव जमणेस, मिरवणुका काढणे व सभा घेणे.

हा हुकुम ज्या सरकारी नोकरांना त्यांची कर्तव्ये व अधिकार बजाविणेचे संदर्भात उपनिर्न्दिष्ट वस्तू हाताळाव्या लागतात आणि एकत्र जमावे लागते व ज्या व्यक्तींनी पोलीस अधिक्षक अगर संबंधित उपविभागीय पोलीस अधिकारी अगर संबंधित विभागाने पोलीस निरीक्षक किंवा सक्षम पोलीस प्राधिकारी यांची परवानगी घेतलेली आहे. अशा व्यक्तींना तसेच सर्व जातीधर्माचे सण/ उत्सव/ जयंती/ यात्रा इ. हे शांततामय मार्गाने लागू पडणार नाही.

# राष्ट्रव्यापी ७ व्या आर्थिक गणनेस नागरिकांनी सहकार्य करावे - जिल्हाधिकारी दौलत देसाई

**कोल्हापूर (प्रतिनिधी) केंद्र शासनाच्या सांख्यिकी मंत्रालयामार्फत राष्ट्रव्यापी ७ व्या आर्थिक गणनेचे काम हाती घेण्यात आले आहे. या आर्थिक गणनेचा नागरिकत्वाशी संबंधित इतर कोणत्याही कायदा किंवा नियमाशी संबंध नाही. परंतु काही ठिकाणी गैर समजुतीतून या गणनेविषयी अनावश्यक शंका उपस्थित करण्यात येत आहेत. नागरिकांनी त्यांच्याकडे केंद्र शासनाच्या इलेक्टॉनिक व माहिती तंत्रज्ञान मंत्रालय अंगिकृत सीएससी ई गव्हर्नन्स सर्विसेस लि. चे अधिकृत ओळखपत्र असलेल्या प्रगणक व परिवेक्षक यांना माहिती देवून सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी दौलत देसाई यांनी केले आहे.**

या गणनेद्वारे देशामध्ये कार्यरत सर्व प्रकारच्या आर्थिक कार्यात गुंतलेल्या आस्थापनांची माहिती गोळा करण्यात येते. या गणनेद्वारे घरगुती उद्योगांसहित देशातील सर्व सूक्ष्म, लघु, मध्यम व मोठ्या वस्तू निर्माण व सेवा क्षेत्रातील आस्थापनांची अद्यावत माहिती प्राप्त होणार असून ती देशाच्या विकास योजनांचे नियोजनासाठी अत्यंत आवश्यक असते.

आतापर्यंत सहा आर्थिक गणना झाल्या असून शेवटची गणना २०१३ साली पूर्ण करण्यात आली आहे. यावेळच्या गणनेमध्ये भारत सरकारचे सांख्यिकी व कार्यक्रम कार्यान्वयन मंत्रालय, केंद्र शासनाच्या इलेक्ट्रॉनिक व माहिती तंत्रज्ञान मंत्रालय अंगीकृत सीएससी ई गव्हर्नन्स सर्विसेस लि. व राज्य शासन यांचा सहभाग असून प्रथमत:च सदर गणनेमध्ये माहिती तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावर वापर करून ही गणना पूर्ण करण्यात येणार आहे. या गणनेसाठी सीएससी मार्फत नियुक्त व्हीएलई (Village Level Entrepreneur) हे प्रथमस्तर पर्यवेक्षक म्हणून काम पाहणार असून त्यांनी त्यांचे कार्यक्षेत्रात आवश्यक त्या प्रमाणात प्रगणक नेमावयाचे आहेत.

या गणनेच्या अंमलबजावणीवर देखरेख करण्यासाठी जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प., जिल्हा पोलीस अधिक्षक यांचा समावेश असलेली जिल्हास्तरीय समन्वय समिती स्थापन करण्यात आलेली आहे. आतापर्यंत जिल्ह्यात सर्वसाधारणपणे १.६३ लाख कुटूंबांची गणना पूर्ण झाली असून दिनांक ३१/३/२०२० पर्यंत सदर गणनचे क्षेत्रकाम पूर्ण करावयाचे आहे. ही गणना फक्त जिल्ह्यातील सर्व लोकांमार्फत सुरू असलेल्या आर्थिक कार्याची माहिती संकलित करण्यासाठीच हाती घेण्यात आली आहे. या गणनेचा नागरिकत्वाशी संबंधित इतर कोणत्याही कायदा किंवा नियमाशी संबंध नाही, याची जाणीव सर्व नागरिकांना करून देण्यात येत आहे. परंतु काही ठिकाणी गैरसमजुतीतून या गणनेविषयी अनावश्यक शंका उपस्थित करण्यात येत आहे, ती योग्य नाही. यामुळे देशातील विविध घटकांसाठी, मागासभागासाठी करण्यात येणा-या विकासात्मक योजनांमध्ये अडथळा निर्माण होईल व अशा विकासास खीळ बसण्याची शक्यता नाकारता येत नाही. यास्तव जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी त्यांच्याकडे केंद्र शासनाच्या इलेक्ट्रॉनिक व माहिती तंत्रज्ञान मंत्रालय अंगीकृत सीएससी ई गव्हर्नन्स सर्विसेस लि.चे अधिकृत ओळखपत्र असलेल्या प्रगणक व पर्यवेक्षक यांना माहिती देउन सहकार्य करावे असे आवाहन ही त्यांनी केले आहे.

# शासनाकडून निधी कमी पडणार नाही सर्वांच्या सहकार्याने भव्य दिव्य सोहळा करु - पालकमंत्री



**कोल्हापूर (प्रतिनिधी) भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या माणगाव येथील परिषदेला १०० वर्षे पूर्ण होत आहेत. या निमित्तानं सामाजिक न्याय विभागामार्फत बांधण्यात आलेल्या स्मारकाचा लोकार्पण सोहळा २१ व २२ मार्च रोजी होणार आहे. सर्वांच्या सहकार्याने हा सोहळा भव्य दिव्य साजरा करू. यासाठी शासनाकडून निधी कमी पडणार नाही, असे आश्वासन पालकमंत्री सतेज ऊर्फ बंटी पाटील यांनी दिले.**

हातकणंगले तालुक्यातील माणगाव येथे उभारण्यात आलेल्या स्मारकाला पालकमंत्री आणि ग्राम विकास मंत्री यांनी भेट देवून सोहळ्याच्या नियोजनाबाबत आज बैठक घेतली. या बैठकीला ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ, खासदार धैर्यशील माने, खासदार संजय मंडलिक, आमदार राजू आवळे, आमदार प्रकाश आवाडे, जिल्हाधिकारी दौलत देसाई, जिल्हा नियोजन अधिकारी सरिता यादव, ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार, माजी आमदार डॉ. सुजित मिणचेकर आदी उपस्थित होते.

बैठकीच्या सुरुवातीला राजर्षी छत्रपती शाहू महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पालकमंत्री आणि ग्रामविकास मंत्री यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. पालकमंत्री श्री. पाटील पुढे म्हणाले, जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत या सोहळ्याबाबत चर्चा होवून मान्यता दिली. त्यानंतर सामाजिक न्यायमंत्री धनंजय मुंडे यांच्याकडे बैठक घेवून, राज्याचा कार्यक्रम म्हणून या सोहळ्याची सर्व जबाबदारी शासनाने घेतली आहे. भारतरत्न डॉ. आंबेडकर यांना देशाचे नेते म्हणून राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी या परिषदेच्या माध्यमातून पुढे आणले. त्यांच्या नेतृत्वावर शिक्कामोर्तब करणारी ही ऐतिहासिक माणगाव परिषद आहे. याच माणगावमध्ये मागासवर्गीय महिला सरपंचाला पद देवून देशाला या गावाने पुरोगामी संदेश दिला आहे.

या सोहळ्यासाठी २६ फेब्रुवारीपर्यंत लेखी स्वरुपात जिल्हाधिकारी कार्यालयात सूचना द्याव्यात, त्यापैकी शक्य असणाऱ्या सूचनांचा समावेश नियोजनात केला जाईल.

'वारणेचा वाघ' हे साप्ताहिक मालक मे. वारणेचा वाघ (भागीदारी संस्था) यांजसाठी मुद्रक व प्रकाशक प्रविण पांडुरंग पाटील यांनी शिव इंप्रेशन, २८२३/६, महालक्ष्मी नगर, सुभाष रोड, कोल्हापूर येथे छापून मु. पो. कोडोली, ता. पन्हाळा जि. कोल्हापूर ४१६११४ येथे प्रसिद्ध केले संपादक-प्रविण पांडुरंग पाटील 'Waranecha Vagha' weekly is owned by M/s. Warnecha Wagh (Partnership Firm), Printed & Published by Pravin Pandurang Patil, Printed at Shiv Impression, 2823/6, Mahalaxmi Nagar, Subhash Road, Kolhapur & Published at A/p. Kodoli, Tal. Panhala, Dist, Kolhapur - 416 114 Editor -Pravin Pandurang Patil. मुख्य कार्यालय: कोडोली (वारणा),ता.पन्हाळा,जि.कोल्हापूर ४१६११४ (महाराष्ट्र), दूरध्वनी(०२३२८)२२३३३९.मोबा.-९८२२८४००३९.email-warnechawagh@gmail.com, web-www.warnechawagh.com सर्व कायदेशीर बाबी कोल्हापूर न्यायालयाच्या कक्षेत. या अंकातील प्रसिध्दी झालेल्या सर्व मजकुरांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

Scanned with CamScanner